# "भावकवी"

समर्थ कवीच्या प्रतिभेचे सामान्य स्वरूप पुढील प्रमाणे सांगतात... कवी शब्द सृष्टीवर राजाप्रमाणे सत्ता गाजवतात. कवी म्हणजे वेद रूपाने अवतारलेला परमेश्वर आहे. कवीचे अंतःकरण म्हणजे सरस्वतीच्या स्वतःच्या मालकीचे राहते घरच समजावे. कवीला सरस्वती पूर्ण वश असते. ती त्याच्यापाशी सदैव राहते. नाना प्रकारच्या कलांना कवी जिवंत ठेवतो तसेच अगदी खऱ्या अर्थाने किती तरी शब्द कवीच्या हृदयात येऊन राहतात. कविता शब्दसंग्रह फार मोठा असतो. जगातील उत्तम मूल्यांचे ऐश्वर्य दाखवण्यासाठी, भगवंताचे श्रवण गाण्यासाठी आणि अनेक तऱ्हेच्या संतांची कीर्ती सांगण्यासाठी कवी जन्मास येतात. कवी हे शब्दरूपी रत्नांचे समुद्र असतात. कवीच्या अंतःकरण रूपी सरोवरात मुक्त पुरुष मोकळेपणाने विहार करतात. कवी अध्यात्म ग्रंथांची खाण असतात. ते खूप आध्यात्मीक ग्रंथ लिहू शकतात. ते बोलके जिवंत चिंतामणी असतात. कवी म्हणजे श्रोत्यांना विनाकष्ट घ्यायला मिळालेली कामधेनूच व तीचे अमृतासमान दूध होय. कवीला प्रतिभेचे कल्पतरू म्हणावे, कारण हवी तेव्हा प्रतिभा त्यांच्या सेवेला हजर असते व प्रेमी पुरुषांच्या प्रेमावस्था कवी शब्दांमध्ये गुंफतात.

हे सर्व गुण आपल्या भावकवींकडे आढळतात. समर्थ रामदास स्वामींनी कवीकडे कोणते गुण असतात हे सांगितले आहे. योगायोग म्हणजे आपले 'भावकवी' श्री नि.ग.सातपुते सज्जनगडच्या पायथ्याशी, सातारच्या मातीत वाढलेले त्यामुळे त्यांच्या अंगी कवीचे सर्वगुण असल्याचे आपण अनुभवले आहे.

त्यांच्या हातून अजूनही श्री सरस्वती ची सेवा घडो आणि त्या निमित्ताने आम्हाला ही काही अमृतकण प्राप्त होवोत.

त्यांना उदंड आयुष्य लाभू दे। अशी आज अमृत दिनी प्रार्थना करतो. जय जय रघुवीर समर्थ॥

लेखन - अरविंद लिमये -
संदर्भ - श्रीमत दासबोध -